2 5 MAY 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# परदेशातही मिळतात ई-प्रमाणपत्रे

## शिवाजी विद्यापीठात १३ वर्षांपासून विद्यार्थी सुविधा केंद्र कार्यरत

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी सध्या जगाच्या कानाकोपऱ्यात नोकरी-व्यवसायाच्या निमित्ताने पोहोचले आहेत. विद्यार्थ्यांना तत्काळ कागदपत्रे मिळवून देण्यासाठी १३ वर्षांपासून विद्यार्थी सुविधा केंद्र कार्यरत आहे. याच्या माध्यमातून एका क्लिकवर घरबसल्या देश-विदेशातही ऑनलाईन प्रमाणपत्रे मिळण्याची सोय उपलब्ध झाली आहे.

एकाच ठिकाणी सर्व सुविधा मिळण्यास सुरुवात झाली. दाखले, दुबार गुणपत्रक, संस्थांतर, स्थलांतर दाखला, उत्तीर्ण प्रमाणपत्र, गुणतक्ता उतारा, गुणतक्ता साक्षांकन, कागदपत्रांची पडताळणी, नावातील बदल, विशेष प्रमाणपत्र, मेरिट रँक सर्टिफिकेट आदी कागदपत्रे कमी

> सुविधा केंद्रामध्ये ई-सुविधा उपलब्ध आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना आवश्यक प्रमाणपत्रे तत्काळ पाठविण्याची सुविधा आहे.
>
> - **डॉ. अजितसिंह जाधव,** संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

कालावधीत मिळतात. नव्या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने विद्यार्थी सुविधा केंद्र यात महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे. डब्ल्यूईएस संस्थेस पाठवली जाणारी सर्व कागदपत्रे विभागामार्फत 'एसएफटीपी' या संगणक प्रणालीद्वारे १३ वर्षांपासून पाठवली जातात. आतापर्यंत गुणतक्ता उतारा (१०४), पदवी प्रमाण (३८), कागदपत्रे साक्षांकन (७) आदी कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली आहे.

2 5 MAY 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात सहा नव्या अभ्यासक्रमांची भर

कोल्हापूर, ता. २४ : शिवाजी विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांमध्ये यावर्षीपासून सहा नव्या अभ्यासक्रमांची भर पडणार आहे. त्यात पदवीचे चार आणि पदव्युत्तर दोन अभ्यासक्रमांचा समावेश आहे. त्यासाठी प्रवेश अर्ज करण्याची प्रक्रिया सुरू आहे. बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पदवीच्या अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊन विद्यापीठात शिक्षण पूर्ण करण्याची संधी मिळणार आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत विद्यापीठ नवीन आणि अद्ययावत अभ्यासक्रम सुरू करण्याची पावले टाकत आहे. त्यात यावर्षी बी. ए. फिल्म मेकिंग, बी. कॉम. बँकिंग अँन्ड फायनान्स, बी. एस्सी.- एम. एस्सी. (आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग), बी. एस्सी.-बी. एड. (चार वर्षे एकात्मिक), एम. बी. ए. (एकात्मिक चार वर्षे) आणि एम. ए. एम. एस्सी ट्रॅव्हल अँड टुरिझम अभ्यासक्रम सुरू केला आहे. गेल्या दोन वर्षांमध्ये बी. ए. स्पोर्टस्, बी. एस्सी.- एम. एस्सी. इकॉनॉमिक्स (पाच वर्षे एकात्मिक), सेंटर डिस्टन्स एज्युकेशनमध्ये बी. ए., बी. कॉम. आदी अभ्यासक्रम सुरू केले आहेत. या सर्व अभ्यासक्रमांसाठी प्रवेश अर्ज करण्याची प्रक्रिया सुरू आहे. विद्यापीठामधील बारावीनंतरचे अभ्यासक्रम हे अन्य महाविद्यालयीन अभ्यासक्रमांपेक्षा वेगळे आहेत. पारंपरिक अभ्यासक्रमांना त्यांच्या रूपाने चांगला पर्याय उपलब्ध झाला आहे.

> ‘नव्या अभ्यासक्रमांमुळे बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना चांगली संधी शिवाजी विद्यापीठाच्या माध्यमातून उपलब्ध झाली आहे. या अभ्यासक्रमांना अर्ज करण्याची प्रक्रिया सध्या सुरू असून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घ्यावा.
>
> **- डॉ. भक्ती नाळे,** उपकुलसचिव, पी. जी. अॅडमिशन विभाग

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 MAY 2024
पुढारी

# विद्यापीठ बँकिंग प्रशिक्षण क्षेत्रात एक पाऊल पुढे

- प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचे प्रतिपादन
- बँक सेवकांसाठी प्रशिक्षण शिबिर



कोल्हापूर : कार्यक्रमात बोलताना प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील.

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोल्हापूर जिल्हा नागरी बँक सहकारी असोसिएशन यांच्या सहकार्याने शिवाजी विद्यापीठ बँकिंग प्रशिक्षण क्षेत्रात एक पाऊल पुढे टाकत असल्याचे प्रतिपादन प्र. कुलगुरू पी. एस. पाटील यांनी केले.

दि मालेगाव मर्चंटस् को-ऑप. बँकेचे सेवक व असो.च्या सदस्य बँकांच्या सेवकांसाठी आयोजित प्रशिक्षण कार्यक्रम बँकिंग ३६० उद्‌घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. प्र. कुलगुरू पाटील म्हणाले, बँकेत नव्याने भरती होणाऱ्या कर्मचाऱ्यांना बँकिंग विषयीचे समग्र ज्ञान देण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित केला आहे. यामुळे कर्मचाऱ्यांची पूर्वतयारी होऊन त्यांनी ग्राहकांना सेवा दिल्यास ग्राहकांना उपयोग होणार आहे. त्याशिवाय बँकेलाही याचा फायदा होईल. दहा दिवसांचे प्रशिक्षण विद्यापीठात सुरू राहणार आहे. डॉ. राजन पडवळ यांनी स्वागत केले. अनिल नागराळे यांनी प्रास्ताविक केले. प्रशिक्षणात ३३ प्रशिक्षणार्थी सहभागी झाले असून १२ प्रशिक्षक प्रशिक्षण देणार आहेत. प्रशिक्षण सोडून ऐतिहासिक स्थळांना भेट, करवीर इतिहास, राजर्षी शाहू महाराजांचा इतिहास, महाराणी ताराबाई यांचा इतिहास, योगा क्लास या गोष्टींचा अंतर्भाव राहणार आहे.

# गुणांमध्ये बदल : रिपब्लिकन स्टुडंट युनियनची आयोगाकडे तक्रार

## विद्यार्थ्यांना कोट्यवधीचा भुर्दंड झाल्याचा आरोप

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या गतवर्षी झालेल्या ३८ अभ्यासक्रमांतर्गत परीक्षा दिलेल्या साडे पंधरा हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी फेरमूल्यांकनासाठी अर्ज दाखल केले होते. यापैकी ९२ टक्के म्हणजेच सुमारे साडेचौदा हजारांहून अधिक विद्यार्थ्यांच्या गुणांमध्ये बदल झाला आहे. त्यामुळे उत्तर तपासणीबाबत रिपब्लिकन स्टुडंटस् युनियनने राज्यपाल, तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाकडे तक्रार दाखल केली असल्याची माहीती युनियनचे प्रमुख अमोल वेटम यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.



विशेष म्हणजे कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील २६ हजार ३४६ विद्यार्थ्यांनी स्वतःच्या उत्तरपत्रिकेच्या फोटोकॉपीची परीक्षा मंडळाकडे मागणी केली होती. फोटोकॉपीसाठी १५० रुपये, तर फेरतपासणीसाठी ५०० रुपये प्रतिपेपर आकारणी केली जाते. यातून जवळपास पावणेदोन कोटी रुपयांचा भुर्दंड विद्यार्थ्यांना सोसावा लागला आहे, याला जबाबदार कोण, असाही प्रश्न वेटम यांनी विचारला आहे.

अर्ज दाखल केलेल्या फेरतपासणीत इतक्या मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांच्या गुणात बदल होत असेल, तर उत्तरपत्रिकेच्या तपासणीच्या पहिल्या टप्प्यातील प्रक्रियेतील शिक्षकांच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाला आहे. शासन निर्णय २०१८ नुसार सीएचबी (तासिका तत्त्वावरील) शिक्षकांना पेपर तपासणी व यासंबंधित कोणतीही कामे देता येणार नाही, असा स्पष्ट आदेश असताना प्रत्यक्षात याच शिक्षकांना पेपर तपासणी, फेरतपासणीबाबत कामे दिली जातात. हे पेपर तपासणी तसेच शिक्षकांच्या नियुक्तीबाबतची माहिती 'माहिती अधिकार कायद्याखाली' जाणीवपूर्वक देण्यात येत नाही.

पहिल्या परीक्षकाने उत्तरपत्रिका तपासल्यानंतर पुन्हा दुसऱ्या परीक्षकाकडून तपासणी होते. या दोन्ही परीक्षकांमधील गुणदानात फरक असतो. जर फेरतपासणीत गुण वाढले तर याचा फायदा विद्यार्थ्यांना दिला जातो. मात्र, गुण कमी झाले तर विद्यार्थ्यांचे नुकसान केले जाते. हा अन्याय आहे. विद्यार्थ्यांचे गुण कमी झाले असल्यास फेरतपासणीच्या आधी दिलेले गुण ग्राह्य धरून त्याचा फायदा देण्याची गरज आहे. काही प्रकरणांत एक-दोन गुणांमुळे विद्यार्थ्यांना नापास केले आहे. त्यामुळे उत्तरपत्रिका तपासणीतील दोष प्रकरणाची सखोल चौकशी व कारवाई करण्याची मागणी आम्ही राज्यपाल, मुख्य सचिव, मुख्यमंत्री, यूजीसी, बीसीआय यांच्याकडे केली असल्याचे या पत्रकात म्हटले आहे.

2 5 MAY 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उपजीविकेला जीविकेची जोड दिल्यास जीवन समृद्ध


## डॉ. व्ही. एन. शिंदे; शिवाजी विद्यापीठात राज्यस्तरीय अक्षर संमेलनाचे उद्घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मानवाचे जीवन सुंदर होण्यासाठी उपजीविकेला जीविकेची जोड असणे महत्त्वाचे असते. या दोन बाबींचे संतुलन आयुष्य समृद्ध करते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

माझी शाळा, माझा फळा समूह व शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित तिसऱ्या राज्यस्तरीय अक्षर संमेलनाचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते.

कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, जगावे कसे यासाठी उपजीविका असते, तर जगायचे का हे जीविका निश्चित करते. माणसाचे जीवन समृद्ध होण्यासाठी या दोन्ही बाबींचा समावेश आणि संतुलन असावे लागते. खरा कलाकार हा त्यातूनच निर्माण होतो. या दोन बाबीच त्यांना आपल्या कलेच्या माध्यमातून सामाजिक दायित्व निभावण्यासाठी प्रवृत्त करीत असतात.. म्हणूनच कलाकार कलेद्वारे आपले सामाजिक-सांस्कृतिक योगदान देण्यासाठी प्रेरित झालेला असतो.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित अक्षर संमेलनाचे उद्घाटन करताना कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे. सोबत प्रशांत वाघमारे, अमित भोरकडे, शुभम गायकवाड, डॉ. विनोद ठाकूरदेसाई आदी.**

माजी स्वागताध्यक्ष प्रशांत वाघमारे व ज्येष्ठ चित्रकार संजय शेलार यांनी मनोगत व्यक्त केले. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी स्वागत केले. अक्षर संमेलनाचे संयोजक अमित भोरकडे यांनी प्रास्ताविक केले. स्वागताध्यक्ष सतीश उपळावीकर यांनी आभार मानले. यावेळी शुभम गायकवाड, नरेंद्र महाडिक, ज्ञानेश पाटमाशे, विजागत ज्ञानेश्वर, राजेंद्र हंकारे यांच्यासह राज्यभरातील कलाकार उपस्थित होते.

25 MAY 2024

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उपजीविकेला जीविकेची जोड दिल्यास जीवन समृद्ध : डॉ. शिंदे

## विद्यापीठात राज्यस्तरीय अक्षर संमेलन



**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मानवाचे जीवन सुंदर होण्यासाठी उपजीविकेला जीविकेची जोड असणे महत्त्वाचे असते. या दोन बाबींचे संतुलन आयुष्य समृद्ध करते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी शुक्रवारी येथे केले. माझी शाळा, माझा फळा समूह आणि शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या वतीने आयोजित तिसऱ्या राज्यस्तरीय अक्षर संमेलनाचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर माजी स्वागताध्यक्ष प्रशांत वाघमारे व ज्येष्ठ चित्रकार संजय शेलार यांनी मनोगत व्यक्त केले. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. विनोद ठाकूर-देसाई यांनी स्वागत केले. अक्षर संमेलनाचे संयोजक अमित भोरकडे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी शुभम गायकवाड, नरेंद्र महाडिक, ज्ञानेश पाटमाशे, विजागत ज्ञानेश्वर, राजेंद्र हंकारे यांच्यासह कलाकार उपस्थित होते.

कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, मानवाला जगण्यासाठी उपजीविकेची आवश्यकता असते. मात्र, त्याचे आयुष्य सुंदर होण्यासाठी त्याला जीविकेची जोड आवश्यक ठरते. खरा कलाकार हा त्यातूनच निर्माण होतो. या दोन बाबीच त्याला आपल्या कलेच्या माध्यमातून सामाजिक दायित्व निभावण्यासाठी प्रवृत्त करीत असतात. म्हणूनच कलाकार कलेद्वारे आपले सामाजिक-सांस्कृतिक योगदान देण्यासाठी प्रेरित झालेला असतो. अक्षर संमेलनाच्या माध्यमातून अशा सर्जनशील कलाकारांचे विद्यापीठामध्ये एकत्र येणे हा अत्यंत चांगला संकेत आहे. स्वागताध्यक्ष सतीश उपळावीकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 MAY 2024

तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात तिसऱ्या अक्षर संमेलनाचे उद्घाटन करताना कुलसचिव डॉ. विलास शिंदे. सोबत प्रशांत वाघमारे, अमित भोरकडे, शुभम गायकवाड आदी.

# जीवन समृद्धीसाठी उपजीविकेला जीवीकेची जोड आवश्यक

- डॉ. विलास शिंदे : शिवाजी विद्यापीठात राज्यस्तरीय अक्षर संमेलनाचे उद्घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर

मानवाचे जीवन सुंदर होण्यासाठी उपजीविकेला जीविकेची जोड असणे महत्त्वाचे आहे. याच्या संतुलनामुळे आयुष्य समृद्ध करते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी केले. माझी शाळा, माझा फळा समूह आणि शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या वतीने आयोजित तिसऱ्या राज्यस्तरीय अक्षर संमेलनाचे उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

डॉ. शिंदे म्हणाले, जगावे कसे, यासाठी उपजीविका असते, तर जगायचे का, हे जीविका निश्चित करते. माणसाचे जीवन समृद्ध होण्यासाठी या दोन्ही बाबींचे संतुलन असणे गरजेचे आहे. अक्षर संमेलनाच्या माध्यमातून अनेक सकारात्मक व सृजनशील बाबी समोर येवून नवोदित कलाकारांना प्रेरित करतील.

माजी स्वागताध्यक्ष प्रशांत वाघमारे व ज्येष्ठ चित्रकार संजय शेलार यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी स्वागत केले. अक्षर संमेलनाचे संयोजक अमित भोरकडे यांनी प्रास्ताविक केले. सतीश उपळावीकर यांनी आभार मानले. यावेळी शुभम गायकवाड, नरेंद्र महाडिक, ज्ञानेश पाटमाशे, विजागत ज्ञानेश्वर, राजेंद्र हंकारे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 MAY 2024
तरूण भारत

# परीक्षा प्रमाद समितीची ३२० विद्यार्थ्यांवर कारवाई


- विविध अभ्यासक्रमाच्या ६५० कॉपी केसेस
- २७४ विद्यार्थ्यांची बुधवारी २९ रोजी होणार चौकशी

**अहिल्या परकाळे**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठांतर्गत उन्हाळी सत्रातील सुरू असलेल्या परीक्षेत आतापर्यंत ६५० विद्यार्थी कॉपी करताना आढळले. यापैकी ३२० विद्यार्थ्यांची परीक्षा प्रमाद समितीसमोर सुनावणी झाली. सुनावणीत चौकशीअंती संबंधित विषयाची संपादणूक रद्द आणि ५०० रूपये दंड अशी कारवाई त्यांच्यावर केली आहे.

परीक्षांतील गुणांवर विद्यार्थ्यांचे पुढील शिक्षण अवलंबून असते. त्यामुळे शिवाजी विद्यापीठातील परीक्षा विभाग कडक शिस्तीत परीक्षा घेतो. असे असूनही गतवर्षी एसआरपीडीच्या माध्यमातून गतवर्षी पेपर फुटीचे प्रकार घडले. यावर विद्यार्थी संघटनांनी आवाज उठवल्यामुळे फुटलेल्या पेपरची पुन्हा परीक्षा घेतली होती. तर या पेपर फुटीतील दोषींना बडतर्फ करण्यात आले. याचा धसका सर्वच महाविद्यालयांनी घेतल्याने यंदा मार्च–एप्रिलच्या परीक्षेत आत्तापर्यंत एकही पेपरफुटीचा प्रकार घडला नाही. ही विद्यापीठासाठी जमेची बाजू आहे.

विद्यापीठांतर्गत उन्हाळी सत्रातील परीक्षांत ६५० पैकी ३२० जणांची चौकशी पूर्ण झाली. उर्वरीत ३३० पैकी २७४ विद्यार्थ्यांना २९ रोजी सुनावणीसाठी बोलावले आहे. उर्वरीत ५६ विद्यार्थ्यांची चौकशीही लवकरच केली जाणार आहे. परीक्षा प्रमाद समितीने सुनावणीसाठी बोलावल्यास दोनवेळा विद्यार्थी गैरहजर राहिला तर समितीचे सदस्य एकमताने संबंधितावर कारवाई करतात. यंदा भरारी पथकांसह बैठ्या पथकातील सदस्यांनीही



**दोषींवर नियमानुसार कारवाई**

परीक्षेत कॉपी करून नये, असे वारंवार आवाहन करूनही परीक्षा कॉपीमुक्त झालेली नाही. नियुक्त भरारी पथकाने चांगले काम केल्यामुळेच कॉपी केसेस समोर येतात. दोषी विद्यार्थ्यांची चौकशी करून नियमानुसार कारवाई केली जाणार आहे.
**डॉ. अजितसिंह जाधव (संचालक, परीक्षा मंडळ, शिवाजी विद्यापीठ)**

चांगले काम केल्यामुळेच अलीकडे कॉपीचे प्रमाण कमी झाले आहे, असे प्रशासनाचे मत आहे.

**काही महाविद्यालयांत ढिसाळ नियोजन**

ग्रामीण भागातील काही महाविद्यालयात विद्यार्थी संख्या कमी असते. अशा महाविद्यालयात विद्यार्थी टिकावेत, यासाठी कॉपी करणाऱ्यांकडे दुर्लक्ष केले जाते. एखाद्या विषयाला दहापेक्षा कमी विद्यार्थी असतील तर संबंधीत विषय बंद होण्याचा धोका असतो. त्यामुळे कॉपीकडे महाविद्यालय प्रशासन दुर्लक्ष करते. अशा महाविद्यालयांकडून परीक्षेचे ढिसाळ नियोजन होते, अशी चर्चा आहे.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाच्या प्रवेश परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल-२०२४ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा दि.२१ पासून व्यवस्थितपणे सुरू झालेल्या आहेत. यामध्ये शुक्रवार दि. २४ रोजी ७ अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा झाल्या. तर १८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले. दरम्यान, दि. २४ रोजी कोल्हापूर जिल्ह्यात ५ गैरप्रकारांची नोंद परीक्षा प्रमाद समितीने केली. सातारा, सांगली जिल्ह्यात कोणत्याही गैरप्रकाराची नोंद झाली नसल्याचे संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी कळवले आहे.

2 5 MAY 2024 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या ५५७ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील ५५७ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. शुक्रवारी बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, बॅचलर आर्किटेक्चर, मास्टर ऑफ आर्टस्, मास्टर ऑफ एज्युकेशन, मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने संलग्न महाविद्यालयांमध्ये सुरळीतपणे पार पडल्या. परीक्षेला १ हजार २ विद्यार्थी बसले. त्यांपैकी ७५ विद्यार्थी अनुपस्थित होते. दि. २४ रोजी एम.जे., एम. टेक., एम.एस्सी. (इंडस्ट्रियल केमेस्ट्री), एम.एस्सी. (इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी), एम.एस्सी. (फिजिकल केमेस्ट्री), एम.एस्सी. (इलेक्ट्रॉनिक्स) आदी १८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 MAY 2024
लोकमत


# १८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च आणि एप्रिल-२०२४ उन्हाळी सत्रात शुक्रवारी ७ पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालयांमध्ये सुरळीतपणे पार पडल्या. या परीक्षांसाठी १,००२ विद्यार्थ्यांपैकी ७५ विद्यार्थी अनुपस्थित होते. दरम्यान, १८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले असून, आजअखेर ५५७ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झालेले आहेत. निकालाची सरासरी ८.२५ इतकी आहे. दरम्यान, शुक्रवारी कोल्हापूर जिल्ह्यात परीक्षेदरम्यान एकूण पाच गैरप्रकारांची नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आलेली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 MAY 2024

पुण्यनगरी




# राधिका कळंत्रेचा कुलगुरु यांच्या हस्ते सत्कार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेत प्रावीण्य मिळवल्याबद्दल शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते राधिका कळंत्रे हिचा सत्कार करण्यात आला. या गुणगौरव सोहळ्याप्रसंगी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, तसेच डॉक्टर पी. एस. पाटील, प्रभारी संचालक विद्यार्थी विकास विभाग डॉ. पी. टी. गायकवाड व संचालक क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागप्रमुख डॉ. एस. व्ही. बनसोडे उपस्थित होते.

राधिका हिने पंजाब येथे ऑल इंडिया युनिव्हर्सिटी सॉफ्टबॉल स्पर्धेत रौप्यपदक पटकाविल्याबद्दल तिचा गुणगौरव करण्यात आला. राधिका यशवंतराव चव्हाण, वारणा महाविद्यालय येथे एम. एस्सी. तसेच राज्यसेवा परीक्षेची तयारी करत आहे.

25 MAY 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# चंदगडच्या खेळाडूंचा विद्यापीठातर्फे गौरव

कोवाड, ता. २४ : येथील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय पातळीवर पदकप्राप्त चार खेळाडूंसह संघ व्यवस्थापकांचा शिवाजी विद्यापीठाने कलर ॲवॉर्ड देऊन गौरव केला. संघ व्यवस्थापक प्रा. आर. टी. पाटील यांना विद्यापीठाने क्रॉसकंट्री व मैदानी संघाचे उत्कृष्ट मार्गदर्शक म्हणून विशेष गौरव केला. राजश्री छत्रपती शाहू सभागृहात झालेल्या गौरव सोहळ्यात कोवाड महाविद्यालयाच्या रोहित राजू भोगण, प्राजक्ता परशराम शिंदे, बबन परशराम शिंदे, सुशांत मनोहर जेथे या खेळाडूंसह संघ व्यवस्थापक प्रा. आर. टी. पाटील यांना विद्यापीठामार्फत कलर ॲवॉर्ड देऊन सन्मानित केले. स्मृतिचिन्ह, ब्लेझर व रक्कम असे ॲवॉर्डचे स्वरूप होते. प्रा. आर. टी. पाटील यांचा उत्कृष्ट मार्गदर्शक म्हणून विशेष गौरव झाला.



कोवाडः कला महाविद्यालयाचे क्रीडाशिक्षक प्रा. आर. टी. पाटील खेळाडूंसमवेत.